# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail : pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र.- ३१ दिनांक २४/०२/२०२१

## ११,४३,१०४/- रुपयांचा प्रतिबंधीत गुटख्रा वाहतुक करणा-या ट्रकसह ईसमासवर गुन्हे शाखा, कक्ष -३ विरारची कारवाई

दि. २४/०२/२०२१ रोजी गुन्हे शाखा, कक्ष-३ विरारचे पोलीस पथक विरार पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असताना बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमीनुसार “मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने वाहतुकीस व विक्रीस प्रतिबंधीत केलेला गुटखा कापड वाहतुक करणा-या ट्रक क्रमांक एम.एच.४८ ए.जी. २०७० मधुन मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गवरुण गुजरात कडुन मुंबई कडे वाहतुक होणर आहे” अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने नमुद ट्रक क्रमांक एम.एच.४८ ए.जी. २०७० सापळा रचुन ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता परिधान करण्याच्या कापडाच्या बॉक्सच्या आडुन मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने वाहतुकीस व विक्रीस प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य अन्न पदार्थ व गुटख्याच्या ११,४३,१०४/- रुपये किंमतीच्या २२ गोण्या मिळुन आल्या असुन त्या व वाहतुकी करीता वापरण्यात आलेला टाटा कंपनीचा आयशस ट्रक क्रमांक एम.एच.४८ ए.जी. २०७० हा असा १८,४३,१०४/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदर बाबत पो.ना/ २८२१ प्रदिप दत्ताराम टक्के, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे येथे भादविसं कलम ३२८,१८८ सह अन्न व सुरक्षा मानके अधिनियम कलम २६,(२),४,३०(१)(ए) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि. यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पो.उपनिरी/ शिवाजी खाडे, सफौ/ अनिल वेळे, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.ना/ प्रदीप टक्के, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.शि/ अश्विन पाटील सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ विरार यांनी केली आहे.

----------ooo-----------